ePaper
धार भोजशाळा 'सरस्वती मंदिर'च! HC कडून हिंदूंना पूजेचा अधिकार

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 16 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

सायकल विरुद्ध बैलगाडी! महापालिकेत राजकीय रंग वाढली

## भारत- युएईत LPG, तेल साठ्याबाबत महत्त्वपूर्ण करार

# युद्धसंकटात भारताला मोठा दिलासा.!



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिका आणि इराणमधील युद्धामुळे संपूर्ण जगाला ऊर्जा संकटाची झळ बसत आहे. या युद्धाचा परिणाम कमी करण्यासाठी भारताने संयुक्त अरब अमिरातीसोबत (UAE) लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (LPG) पुरवठ्याबाबत एक धोरणात्मक करार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युएईच्या अवघ्या दोन तासांच्या संक्षिप्त दौऱ्यात या करारावर स्वाक्षरी झाली.भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा एलपीजी आयातदार देश असून, जागतिक तणावाच्या परिस्थितीत पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.**



### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पाच देशांचा दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ते २० मे दरम्यानच्या आपल्या पाच देशांच्या दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी अबू धाबी संक्षिप्त दौन्रांनत नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या देशांना भेट देणार आहेत. व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, नाविन्यता (INNOVATION) आणि हरित विकास (GREEN GROWTH) या क्षेत्रांमधील भारताची धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करणे, तसेच युरोप आणि आखाती देशांसोबत नवी दिल्लीचे वाढते संबंध अधिक मजबूत करणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

### पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ...

मोदींनी देशाला केलेल्या आवाहनानंतर काही दिवसांतच, आज भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती प्रतिलीटर ३ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. स्थानिक करांमुळे वेगवेगळ्या शहरांमध्ये या किमती वेगवेगळ्या असू शकतात. इंधनाच्या दरात झालेली ही वाढ अचानक झालेली नाही, कारण पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी यापूर्वीच अशा प्रकारची दरवाढ होण्याची शक्यता असल्याचे संकेत दिले होते.

### ५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची कटिबद्धता

एलपीजी, दोन्ही देशांनी धोरणात्मक पेट्रोलियम साठ्याबाबत एका सामंजस्य करारासह संरक्षण, ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि बँकिंग क्षेत्रात मोठे करार आणि गुंतवणुकीच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. भारत आणि युएई दरम्यान 'स्ट्रॅटेजिक डिफेन्स पार्टनरशिप' (धोरणात्मक संरक्षण भागीदारी) च्या फ्रेमवर्कवर करार स्वाक्षरी करण्यात आला, ज्यामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय धोरणात्मक आणि सुरक्षा सहकार्य अधिक मजबूत होणार आहे. एका मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणेअंतर्गत, भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रासह RBL बँक आणि सामन कॅपिटल (SAMMAN CAPITAL) मध्ये तब्बल ५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली.

### पंतप्रधान मोदींच्या संक्षिप्त दौऱ्यात महत्त्वाचे करार

पंतप्रधान मोदी भारत-नॉर्डिक शिखर परिषदेलाजात असताना अबुधाबी येथे काही वेळ थांबले होते. या संक्षिप्त थांब्यादरम्यान हे महत्त्वाचे करार करण्यात आले. पश्चिम आशियातील सध्याच्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर, मोदींनी आपल्या या भेटीत युएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांची भेट घेतली. याशिवाय, भारत आणि युएई दरम्यान दोन्ही देशांमधील धोरणात्मक संरक्षण भागीदारीच्या चौकटीबाबत एक करार आणि गुजरातच्या वाडिनार येथे 'शिप रिपेअर क्लस्टर' (जहाज दुरुस्ती केंद्र) उभारण्याबाबतच्या सामंजस्य करारावरही स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

# पुणे हॉस्पिटल बॉम्ब प्रकरणात मोठी कारवाई

## नागपूर रेल्वे स्थानकावर संशयित आरोपी ताब्यात, गुन्ह्याची दिली कबुली

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील हडपसर परिसरातील रुग्णालयाबाहेर जिवंत बॉम्ब (IED) ठेवल्याच्या धक्कादायक प्रकरणात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाला (ATS) मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील संशयित आरोपीला नागपूर रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेण्यात आले असून, प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे काही दिवसांपासून पुण्यात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणानंतर तपास यंत्रणांना मोठा धागा मिळाला आहे.**





माहितीनुसार, शिवाजी राठोड असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे. आरोपी आझाद हिंद एक्सप्रेसने नागपूरला पोहोचणार असल्याची माहिती ATS ला मिळाली होती. त्यानंतर नागपूर रेल्वे स्थानकावर सापळा रचण्यात आला. गाडी प्लॅटफॉर्म क्रमांक 6 वर आल्यानंतर आरोपी खाली उतरताच आधीपासूनच तैनात असलेल्या ATS च्या पथकाने त्याला वेढा घालत ताब्यात घेतले. संपूर्ण कारवाई अत्यंत गोपनीय आणि शिताफीने पार पडल्याचे सांगितले जात आहे.

सध्या आरोपीची नागपूर येथील ATS कार्यालयात कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणामागे आणखी कोणी आहे का? आरोपीने हे कृत्य नेमक्या कोणत्या हेतूने केले? याचा तपास यंत्रणा शोध घेत आहेत.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ATS आणि गुप्तचर यंत्रणा (IB) तपासात सहभागी झाल्या होत्या. तपासासाठी परिसरातील 100 हून अधिक CCTV फुटेज तपासण्यात आले. संशयास्पद हालचालींच्या आधारे अनेकांची चौकशी करण्यात आली. तांत्रिक पुरावे आणि फुटेजच्या आधारे तपास यंत्रणा आरोपीपर्यंत पोहोचल्या आणि त्याचे लोकेशन नागपूरमध्ये असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर येत असली, तरी याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. या प्रकरणाचे धागेदोरे आणखी कुठे पोहोचतात, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे राज्यभरात एकच खळबळ उडाली असून, सुरक्षा यंत्रणांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. आरोपीच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची माहिती आणि त्याचे मोबाईल कॉल रेकॉर्ड्स तपासले जात असून, तपास अधिक व्यापक करण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने नागरिकांमध्येही मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

### नेमकं प्रकरण काय?

बुधवारी सायंकाळी हडपसरमधील कामधेनू इस्टेट परिसरात असलेल्या उषाकिरण रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ संशयास्पद बॉम्बसदृश वस्तू आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिस, बॉम्बशोधक पथक, अग्निशमन दल आणि इतर सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. परिसर तातडीने सील करण्यात आला आणि रुग्णालय परिसरातील नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलवण्यात आले. तपासादरम्यान ती वस्तू जिवंत IED असल्याचे स्पष्ट झाले.

## जिल्हा नियोजन समितीची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन बैठक

**महाईन्यूज । पुणे**

**आखाती देशातील युद्ध परिस्थितीमुळे आर्थिक काटसकरीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीची आज, शुक्रवारी (१५ मे) होणारी बैठक ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. राज्य शासनाने बैठका ऑनलाइन घेण्याचे आदेश दिले आहेत.**




जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) दुसरी बैठक शुक्रवारी होणार असून, त्यामध्ये सन २०२६-२७ या वर्षाच्या १,४७२ कोटी रुपयांच्या आराखड्याच्या नियोजनासंदर्भात चर्चा होणार आहे. तसेच, या बैठकीत जानेवारी महिन्यात झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला अंतिम मंजुरी दिली जाणार असून, नव्याने कोणत्या कामांचा समावेश करावा आणि कोणत्या कामांसाठी निधी उपलब्ध करावा लागणार यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

यापूर्वीच्या नियोजनानुसार ही बैठक विधान भवनात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत होणार होती. मात्र, सरकारच्या नवीन निर्णयामुळे आता नगरपालिका, जिल्हा परिषद आणि अन्य सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी विधानभवनात न येता आपापल्या कार्यालयातूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या बैठकीला उपस्थिती राहणार आहेत.

दरम्यान, अधिकारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित राहणार असले तरी, बैठकीचे गांभीर्य लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या विधान भवनातूनच बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. त्यांच्याबरोबर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आणि निवडक कर्मचारी विधान भवनात उपस्थित राहून तांत्रिक बाबींचे नियंत्रण करतील. जिल्हा नियोजन विभागाने त्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

या बैठकीत ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा विकासावर विशेष भर दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या विभागांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद अपेक्षित आहे. जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी सदस्यांकडून विविध सूचना मांडल्या जाणार आहेत. गावपातळीवरील मूलभूत सुविधा मजबूत करण्यासाठी नवीन प्रस्तावांचा समावेश होण्याची शक्यता आहे. महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र निधी वाढविण्याची मागणीही बैठकीत होऊ शकते. शहरी आणि ग्रामीण भागातील समतोल विकासावर समितीचा विशेष भर राहणार आहे.

### विविध योजनांवरही चर्चा

युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीच्या योजनांवरही चर्चा अपेक्षित आहे. आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण आणि नवीन वैद्यकीय सुविधा उभारण्याचा मुद्दाही बैठकीत मांडला जाणार आहे. कृषी क्षेत्रासाठी सिंचन आणि जलसंधारण प्रकल्पांना प्राधान्य देण्याची मागणी होण्याची शक्यता आहे. डिजिटल प्रशासन प्रणाली अधिक सक्षम करण्यावरही भर दिला जाणार आहे. ऑनलाइन बैठकीमुळे वेळ आणि प्रशासकीय खर्चात बचत होणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

# महापालिकेतील ६० कोटींचा कथित भ्रष्टाचार शासनाच्या कोर्टात

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा अहवाल सादर; पुढील निर्णयाची प्रतीक्षा

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेतील ६० कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणाचा निर्णय आता राज्य शासनाच्या कोर्टात गेला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या प्रकरणाचा सविस्तर अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत दिली. त्यामुळे या प्रकरणात शासन काय भूमिका घेते आणि पुढे कोणती कारवाई होते याकडे राजकीय व प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**



महापालिकेतील आर्थिक व्यवहार आणि कामकाजाशी संबंधित या कथित गैरव्यवहाराबाबत गेल्या काही दिवसांपासून मोठी चर्चा सुरू आहे. विरोधकांकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित कागदपत्रे आणि अहवाल राज्य शासनाकडे पाठवले आहेत.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्वसाधारण सभेत बोलताना, "संबंधित प्रकरणाचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. पुढील निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल," असे स्पष्ट केले. त्यामुळे आता या प्रकरणात चौकशी, कारवाई किंवा अन्य प्रशासकीय निर्णय घेण्याचा अधिकार राज्य शासनाकडे गेला आहे, असे सांगितले.

दरम्यान, या मुद्द्यावर महापालिका सभागृहातही जोरदार चर्चा झाली. नगरसेविका सुलभा उबाळे यांनी हा अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा, अशी ठाम मागणी केली. "जनतेच्या पैशांशी संबंधित इतक्या मोठ्या प्रकरणाची माहिती लोकप्रतिनिधींना मिळणे आवश्यक आहे. अहवाल सभागृहात ठेवल्यास सत्य समोर येईल," असे त्या म्हणाल्या.

या बाबत बोलताना नगरसेवक संदीप वाघेरे यांनी सत्ताधारी याला जबाबदार असल्याचे म्हणाले. तर गेल्या कालावधीत आपणही सत्तेत होतात. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना केवळ दोषी धरू नका असे प्रतित्तूर सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिले.

या प्रकरणामुळे महापालिकेतील प्रशासन आणि राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. विरोधकांनी पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. तर सत्ताधारी गटाकडून शासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करण्याची भूमिका घेतली जात आहे. ६० कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराच्या या प्रकरणात शासन नेमका कोणता निर्णय घेते, चौकशीचा विस्तार होतो का आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अहवाल शासनाकडे, निर्णय प्रलंबित...

महापालिकेतील ६० कोटींच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणाचा अहवाल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी राज्य शासनाकडे सादर केला असून, आता चौकशी व पुढील कारवाईचा निर्णय शासन स्तरावर घेतला जाणार आहे.

# सायकल विरुद्ध बैलगाडी! महापालिकेत राजकीय रंगत वाढली

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या (जीबी) पार्श्वभूमीवर आज शुक्रवारी (दि. १५) महापालिका परिसरात नाट्यमय घडामोडी घडल्या. इंधन दरवाढ, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाचा निषेध तसेच ५२ कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आल्याचे चित्र पाहायला मिळाले.**





राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक राजू बनसोडे, नगरसेविका स्वाती काटे आणि प्रतिक्षा लांघी-जवळकर हे महापालिकेत थेट बैलगाडीवरून दाखल झाले. वाढत्या पेट्रोल-डिझेल दराविरोधात त्यांनी हे अनोखे आंदोलन करत भाजप सरकारवर जोरदार टीका केली. "इंधन दर इतके वाढले आहेत की आता सामान्य नागरिकांना वाहन वापरणे कठीण झाले असून बैलगाडीची वेळ आली आहे," असा टोला आंदोलनकर्त्यांनी लगावला. बैलगाडीच्या आंदोलनामुळे महापालिका परिसरात काही काळ मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान, महापौर रवी लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत सायकलवरून महापालिकेत आगमन केले. पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देण्याचा प्रयत्न यामागे असल्याचे सांगण्यात आले. महापौर आणि आयुक्तांच्या सायकल रॅलीचीही परिसरात चर्चा रंगली. दुसरीकडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महापालिकेतील कथित ५२ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित केला. चुकीच्या पद्धतीने उपसूचनेवर सही करणाऱ्या नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. "महापालिकेत आर्थिक गैरव्यवहार होत असून त्याची चौकशी झाली पाहिजे," असा आरोप मनसेच्या वतीने करण्यात आला. एकाच दिवशी बैलगाडी आंदोलन, सायकलवरून आगमन आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे पिंपरी चिंचवड महापालिकेतील वातावरण तापल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले.

### सायकल-बैलगाडी आंदोलनाची चर्चा

इंधन दरवाढीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी बैलगाडीवरून महापालिकेत आगमन करत सरकारवर जोरदार टीका केली, तर दुसरीकडे महापौर रवी लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत सायकलवरून येत पर्यावरणपूरक संदेश दिला. याचवेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ५२ कोटींच्या कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत कारवाईची मागणी केली. एकाच दिवशी सायकल रॅली, बैलगाडी आंदोलन आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे महापालिका परिसरात राजकीय वातावरण तापले.





## भूमिका

**भारतात सोने हे केवळ दागिना नसून श्रद्धा, परंपरा, सुरक्षित गुंतवणूक आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. धनत्रयोदशी, अक्षय तृतीया, विवाहसोहळे किंवा इतर शुभ प्रसंगी सोने खरेदी करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे. विशेषतः ग्रामीण भागात सोने हे आर्थिक सुरक्षिततेचे साधन मानले जाते.**

# सोन्याची चमक आणि अर्थव्यवस्थेवरील भार



त्यामुळे भारतीय नागरिक दररोज मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी करतात. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या माहितीनुसार, भारतात दररोज सरासरी सुमारे दोन टन सोने खरेदी केले जाते. मात्र, या वाढत्या सोन्याच्या मागणीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत.

भारत हा चीननंतर जगातील दुसरा सर्वात मोठा सोन्याचा उपभोक्ता आहे. परंतु देशातील सोन्याचे उत्पादन अत्यल्प असल्याने ९० टक्क्यांहून अधिक गरज आयातीद्वारे भागवावी लागते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताची सोन्याची आयात विक्रमी ७१.९८ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली. ही वाढ देशाच्या व्यापार तुटीला आणि चालू खात्यातील तुटीला कारणीभूत ठरत आहे. कारण सोन्याची आयात अमेरिकन डॉलरमध्ये केली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च होते आणि रुपयावर दबाव निर्माण होतो. रुपया कमजोर झाल्यास आयात आणखी महाग होते आणि त्याचा परिणाम महागाईवरही होतो. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, सोन्याच्या वाढत्या आयातीमुळे चालू खात्यातील तूट वाढून जीडीपीच्या १.३ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

तसेच परकीय चलनसाठ्यावरही त्याचा परिणाम दिसून येत आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना अनावश्यक सोने खरेदी कमी करण्याचे आवाहन केले आहे. हे आवाहन केवळ आर्थिक दृष्टिकोनातून नव्हे, तर राष्ट्रीय हित लक्षात घेऊन करण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा नाही की नागरिकांनी पूर्णपणे सोने खरेदी थांबवावी. परंतु सध्या गरज नसताना केवळ परंपरेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर होणारी खरेदी टाळणे आवश्यक आहे. सोने हे निष्क्रिय गुंतवणूक साधन मानले जाते, कारण त्यातून उद्योग, रोजगार किंवा उत्पादन वाढीस थेट चालना मिळत नाही. त्याऐवजी नागरिकांनी शेअर बाजार, म्युच्युअल फंड, सरकारी रोखे किंवा पायाभूत विकासाशी संबंधित गुंतवणुकीकडे वळल्यास देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लागू शकतो.

भारतीय समाजात सोन्याचे महत्त्व कायम राहणार हे निश्चित आहे. मात्र, सध्याच्या जागतिक आर्थिक परिस्थितीत विवेकपूर्ण खरेदी करणे गरजेचे आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्थैर्य टिकवण्यासाठी नागरिकांनी काही काळ अनावश्यक सोन्याची खरेदी पुढे ढकलली, तर ते राष्ट्रीय जबाबदारीचे आणि आर्थिक सजगतेचे उदाहरण ठरेल.

## प्रासंगिक »

### ऋषी अष्टावक्र

**अष्टावक्र हे हिंदू धर्मातील महान ज्ञानी व विचारवंत होते. त्यांचे शरीर आठ ठिकाणी वाकडे असल्यामुळे त्यांना अष्टावक्र असे नाव पडले. एकदा ते राजा जनक यांच्या दरबारात गेले.**

दरबारात मोठमोठे पंडित, विद्वान आणि ज्ञानी लोक उपस्थित होते. अष्टावक्र दरबारात प्रवेश करताच त्यांच्या विचित्र शरीराकडे पाहून सर्वजण हसू लागले.

हे पाहून अष्टावक्रही मोठ्याने हसू लागले. राजा जनकांनी आश्चर्याने विचारले, "हे ऋषी, लोक तुमच्यावर हसत आहेत हे समजले; पण तुम्ही का हसता आहात?" अष्टावक्र शांतपणे म्हणाले, "महाराज, मला वाटले होते की आपल्या सभेत ज्ञानी लोक असतील. पण येथे तर सर्वजण फक्त बाह्य रूप पाहणारे आहेत.

माझ्या ज्ञानाकडे न पाहता शरीरावरून माझी थट्टा केली जात आहे, हे पाहून मला त्यांच्या बुद्धीची कीव आली." अष्टावक्रांचे उत्तर ऐकून संपूर्ण सभा लाजली. राजा जनकांनाही आपली चूक समजली.

- तात्पर्य : माणसाचे खरे मूल्य त्याच्या रूपात नसून ज्ञान, परिश्रम आणि कर्मात असते.

जागतिक पातळीवरील अस्थिर परिस्थिती, आखाती युद्धाची गुंतागुंत आणि वाढत्या आर्थिक दबावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना काटकसरीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

# मिशन काटकसर : काळाची गरज आणि राष्ट्रीय जबाबदारी




सोने खरेदी कमी करणे, पेट्रोल-डिझेलचा वापर मर्यादित ठेवणे आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे या सप्तसूत्रीमागचा उद्देश स्पष्ट आहे— देशाचे परकीय चलन वाचवणे आणि अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत करणे. विशेष म्हणजे, सरकारने केवळ आवाहन करून थांबण्याऐवजी स्वतःपासून या मोहिमेची सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःचा वाहनताफा कमी केला, तर अनेक केंद्रीय मंत्र्यांनीही इंधन बचतीचे उपाय स्वीकारले. मध्य प्रदेशचे मंत्री ई-स्कूटरने कार्यालयात पोहोचले, न्यायमूर्ती सायकलने न्यायालयात गेले, तर अनेक राज्यांनी व्हर्च्युअल बैठकींना प्राधान्य दिले. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मिशन काटकसर' राबवत सरकारी खर्चात कपात करण्याचे निर्देश दिले आहेत.

नेतृत्वाने दाखवलेला हा आदर्श जनतेसाठी प्रेरणादायी आहे.भारतात यापूर्वीही अशा कठीण काळाचा सामना करण्यात आला आहे. १९६५ च्या युद्धानंतर आणि दुष्काळाच्या संकटात तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी नागरिकांना आठवड्यातून एक वेळ उपवास करण्याचे आवाहन केले होते. संपूर्ण देशाने त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आजही त्याच राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे. इंधन बचतीचे महत्त्व आज अधिक वाढले आहे. महानगरांमधील वाहतूक कोंडीमुळे दररोज अब्जावधी रुपयांचे अतिरिक्त इंधन जळते. वर्क फ्रॉम होम, कारपुलिंग आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविल्यास इंधन बचतीसोबतच प्रदूषण आणि वाहतूक कोंडीही कमी होऊ शकते.

सरकारने गर्दीच्या शहरांमध्ये 'कन्जेशन प्राइसिंग'चा विचार सुरू केला आहे, हीदेखील सकारात्मक बाब आहे. सोन्याची अनावश्यक खरेदी, परदेश दौरे किंवा दिखाऊ खर्च यांना मर्यादा घालणे हीदेखील काळाची गरज बनली आहे. भारताची लोकसंख्या आणि सामूहिक ताकद लक्षात घेतली, तर प्रत्येक नागरिकाची छोटी बचतही देशासाठी मोठे योगदान ठरू शकते. कोरोना संकटानंतर भारतीय अर्थव्यवस्थेने जशी दमदार पुनरागमन केले, तसेच या संकटातूनही भारत अधिक सक्षमपणे बाहेर पडू शकतो. मात्र, त्यासाठी सरकारसोबत जनतेचीही तितकीच साथ आवश्यक आहे. "मिशन काटकसर" ही केवळ सरकारी मोहीम नसून राष्ट्रहितासाठीची सामूहिक जबाबदारी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥

घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रम्ह ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्रात ‘संघटन सृजन’ला वेग

## नांदेडमध्ये नियुक्त्या रखडल्या! प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे नांदेडवर बारकाईने लक्ष

**महाईन्यूज । नांदेड**

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या “संघटन सृजन अभियान”अंतर्गत राज्यभरात संघटन मजबुतीसाठी हालचालींना वेग आला असून चार विभागांतर्गत विविध जिल्ह्यांतील ब्लॉकस्तरीय नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. मात्र या प्रक्रियेत नांदेड जिल्ह्याच्या नियुक्त्या रखडल्याने काँग्रेस वर्तुळात चिंतेचे ढग पसरले आहेत. असे असले, तरी रखडलेल्या नियुक्त्यांमागे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे नांदेडसंदर्भात बारकाईने लक्ष असल्याची कारणमीमांसा केली जात आहे.**



केंद्रीय निरीक्षकांसह प्रदेश काँग्रेसच्या निरीक्षकांनी राज्यभर जिल्हानिहाय प्रत्यक्ष दौरे करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या अहवालावर आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्यांक विभागाचे ब्लॉक अध्यक्ष व कार्याध्यक्ष, विमुक्त जाती-भटक्या जमाती विभागाचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष, सोशल मीडिया ब्लॉक अध्यक्ष व कार्याध्यक्ष तसेच सेवा दलाचे ब्लॉक अध्यक्ष व कार्याध्यक्ष अशा महत्त्वाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये या नियुक्त्या जाहीर झाल्या असल्या तरी नांदेड जिल्ह्याच्या नियुक्त्या थांबविण्यामागे प्रदेश नेतृत्व विशेष सावध भूमिका घेत असल्याची माहिती काँग्रेसमधील सूत्रांनी दिली आहे. नांदेड जिल्ह्यात काँग्रेसमध्ये राहून भाजपासाठी काम करणाऱ्या “स्लीपर सेल” कार्यकर्त्यांवर प्रदेश नेतृत्वाचे लक्ष असल्याची चर्चा पक्षांतर्गत सुरू आहे.

यापूर्वीही प्रदेशाध्यक्षांचे अनेक आदेश नांदेडमधून धुडकावण्यात आल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे आगामी नियुक्त्यांमध्ये अत्यंत बारकाईने छाननी केली जात असल्याचे समजते. दरम्यान, नांदेडमधील संघटनात्मक बदल आणि आगामी नियुक्त्यांकडे प्रदेश नेतृत्वाचे विशेष लक्ष लागले असून, येथील निर्णय आगामी राजकीय समीकरणांसाठी महत्त्वाचे ठरणार असल्याची चर्चा काँग्रेस वर्तुळात रंगत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही पदाधिकाऱ्यांच्या राजकीय हालचालींवर प्रदेश स्तरावरून स्वतंत्र अहवाल मागविण्यात आल्याची चर्चा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे. निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याबाबत प्रदेश नेतृत्व सकारात्मक असल्याची माहिती समोर येत आहे. पक्षविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा संशय असलेल्या काही कार्यकर्त्यांची गोपनीय पडताळणी सुरू असल्याचेही बोलले जात आहे.

नांदेड जिल्ह्यातील नियुक्त्यांमध्ये युवा आणि सक्रिय चेहऱ्यांना प्राधान्य दिले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील गटबाजी कमी करून संघटना एकसंध ठेवण्यावर वरिष्ठ नेत्यांचा भर असल्याचे समजते. त्यामुळे नांदेडमधील आगामी नियुक्त्या आणि संघटनात्मक फेरबदल राज्यातील काँग्रेसच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### दिल्लीतही वेग येणार

काँग्रेसचे केंद्रीय निरीक्षक हरकला वेणूगोपाल राव यांनी राज्यातील संघटनात्मक परिस्थितीचा अहवाल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडे सादर केला आहे. केरळमधील मुख्यमंत्रीपदाच्या निर्णय प्रक्रियेमुळे महाराष्ट्रातील “संघटन सृजन”अंतर्गत जिल्हाध्यक्ष नियुक्त्या काही काळ रखडल्याची माहिती आहे. दरम्यान, काँगेस महासचिव खा.के.सी.वेणुगोपाल आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला हे दोघेही मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत होते; परंतु आता केरळ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष के.सी.सतीशन यांची नेतेपदी निवड निश्चित झाल्यानंतर आता महाराष्ट्रातील संघटन सृजन अंतर्गत जिल्हाध्यक्ष नियुक्त्यांच्या प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लवकरच यासंदर्भात दिल्लीत एक अंतिम बैठक होणार असून त्यानंतर जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या घोषित होतील.

## मंत्री झिरवाळ यांना ब्लॅकमेल करणे भोवले! तृतीयपंथी अॅड. पवन यादवची हकालपट्टी

**महाईन्यूज । मुंबई**

**अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांची चित्रफितीद्वारे बदनामी करणे अॅड. संजय यादव याला भोवले आहे. राज्यस्तरीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळावरील अशासकीय सदस्य अॅड. पवन यादव यांची अखेर राज्य सरकारने हकालपट्टी केली. सामाजिक न्याय विभागाने शासन आदेश काढत त्यांची नियुक्ती तत्काळ रद्द केल्याचे जाहीर केले. मंत्री झिरवाळ यांच्या बदनामी प्रकरणात सहभाग असल्यानेच सरकारकडून हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.**



तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या नामवंत संस्थेतील तृतीयपंथी (ट्रान्सवुमन) व्यक्ती या प्रवर्गातून पवन यादव याची मंडळावर नियुक्ती करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय धोरण २०२४ अंतर्गत मंडळाची पुनर्रचना करण्यात आल्यानंतर एप्रिल २०२५ मध्ये यादव याची नियुक्ती झाली होती. मात्र, महिनाभरातच सरकारला हा निर्णय मागे घ्यावा लागण्याची नामुष्की ओढवली आहे. नियुक्तीनंतर काही तृतीयपंथीय संघटनांनी त्याच्या निवडीवर आक्षेप घेतला होता. प्रतिनिधित्वाच्या निकषांबरोबरच राजकीय दबाव आणि वादग्रस्त हालचालींबाबत सरकारकडे तक्रारी पोहोचल्या होत्या. दरम्यान, मंत्री झिरवाळ यांच्याशी संबंधित संवेदनशील माहितीच्या आधारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचे प्रकरण उघडकीस आले. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत, अखेर नियुक्ती रद्द करण्याचा निर्णय घेतला. सामाजिक न्याय विभागाचे अवर सचिव विवेक शिंदे यांनी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला आहे.

मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात यादव याच्याविरोधात खंडणीसंदर्भात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, मंत्री झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित अश्लील व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर तृतीयपंथी पवन यादव याचे भाऊ रवी यादव यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये दिसणारी व्यक्ती मंत्री झिरवाळ असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, हा व्हिडीओ पवन यादव याने स्वतःच्या मोबाईलमध्ये चित्रीत केल्याचेही त्यांनी सांगितले.

### अनेक आमदार आणि राजकीय नेत्यांबरोबर संबंध

यादव याच्यावर मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. मंत्री झिरवाळ यांची अश्लील चित्रफित समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर तृतीयपंथी पवन यादव यांचे बंधू रवी यादव यांनी एका वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया दिली. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये दिसणारी व्यक्ती मंत्री झिरवाळ हेच आहेत. माझा भाऊ पवन यादव यानेच हा व्हिडीओ आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला आहे, असे म्हटले आहे. पवन याने अनेक आमदार आणि राजकीय नेत्यांबरोबर संबंध ठेवले असून त्याच्या मोबाईलमध्ये त्या संदर्भातील व्हिडीओ असल्याचे तो म्हणाला होता.

# बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे वागतात

## याचिकाकर्त्याच्या मागील सोशल मीडिया पोस्टचा संदर्भ देत न्यायालयाने सुनावले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नोकरी न मिळालेले बेरोजगार तरुण सोशल मीडिया, आरटीआय (RTI) आणि इतर प्रकारचे कार्यकर्ते बनतात आणि सर्वांवर हल्ले करू लागतात. समाजात आधीच असे अनेक परजीवी आहेत जे व्यवस्थेवर हल्ले करत आहेत आणि तुम्हालाही त्यांच्याशी हातमिळवणी करायची आहे का?" अशा शब्दांत सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत यांनी वरिष्ठ अधिवक्ता पदाचा दर्जा मिळावा यासाठी याचिका करणाऱ्या वकिलाला फटकारले.**



### न्यायालयात नेमके काय घडले ?

"समाजात अनेक परजीवी वावरत आहेत, ते सातत्याने व्यवस्थेला लक्ष्य करत असतात. तुम्हाला देखील त्यांची हात मिळवायचा आहे का?", असा थेट सवाल खंडपीठाने याचिकाकर्त्या वकिलाला विचारला. तसेच, "कदाचित सगळचे जगच वरिष्ठ वकील पदासाठी पात्र ठरेल. पण, किमान तुम्ही तरी या पदासाठी पात्र नाहीत", असा शब्दात खंडपीठाने वकिलाला खडसावले. "दिल्ली उच्च न्यायालयाने जरी वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती केली असती तरी तुमचे व्यावसायिक वर्तन पाहता सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय रद्द केला असता", असेही न्यायालयाने पुढे स्पष्ट केले.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देशातील काही बेरोजगार तरुणांची तुलना 'झुरळांशी' केली. "काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात", अशा शब्दात सरन्यायाधीशांनी ताशेरे ओढले. "असे तरुण पुढे जाऊन माध्यमं, समाज माध्यमं आणि माहिती अधिकार (आरटीआय) कार्यकर्ते बनतात आणि व्यवस्थेवर हल्ले करू लागतात", असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी शुक्रवारी नोंदवले, असे वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.

पीटीआयच्या वृत्तानुसार, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. एका वकिलाने स्वतःला वरिष्ठ वकील म्हणून नियुक्त करण्याच्या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करत असताना न्यायालयाने याचिकाकर्त्या वकिलाच्या व्यावसायिक वर्तनावर कडक शब्दात ताशेरे ओढले. समाजात आधीच अनेक परजीवी वावरत असून ते सतत व्यवस्थेला टार्गेट करत असल्याचे भाष्य यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केले.

सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याने फेसबुकवर वापरलेल्या भाषेचा संदर्भ देत संताप व्यक्त केला. सुनावणीवेळी न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या वर्तनावर, यापूर्वी सोशल मीडियावर केलेल्या पोस्ट याचा दाखल देत वकिलाच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. याचिकाकर्त्यांनी फेसबुकवर वापरलेली भाषा त्याची वरिष्ठ म्हणून नियुक्ती करण्यासाठी योग्य नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. "त्यांच्या कायद्याच्या पदवीबाबत मला शंका आहे... ते फेसबुक, यूट्यूबवर ज्या गोष्टी पोस्ट करतात त्याकडे आमचे लक्ष नाही असे त्यांना वाटते. व्यावसायिक शिस्त काय असते हे मी तुम्हाला दाखवतो", असेही सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले.

याच दरम्यान एकूणच सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले: "समाजात आधीच असे अनेक परजीवी आहेत जे व्यवस्थेवर हल्ले करत आहेत आणि तुम्हाला त्यांच्याशी हातमिळवणी करायची आहे. काही तरुण, झुरळांसारखे आहेत, ज्यांना कुठेही रोजगार मिळत नाही किंवा त्यांच्या व्यवसायात स्थान मिळत नाही, ते मीडिया, सोशल मीडिया, आरटीआय कार्यकर्ते किंवा इतर प्रकारचे कार्यकर्ते बनतात आणि प्रत्येकावर हल्ले करू लागतात."

# 'होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सर्व जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी इराण तयार'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराणशी संबंधित कोणत्याही समस्येवर लष्करी कारवाई हा अंतिम पर्याय असू शकत नाही, असे स्पष्ट प्रतिपादन इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी केले आहे. यावेळी त्यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावपूर्ण परिस्थितीवर भाष्य करताना सर्व व्यापारी जहाजांना सुरक्षित मार्ग देण्याची तयारी दर्शवली.**




### अमेरिका आणि पाकिस्तानबाबत भाष्य

यावेळी त्यांनी अमेरिका आणि पाकिस्तानशी संबंधित मुद्द्यांवरही आपली मते मांडली. पाकिस्तानने केलेली मध्यस्थी अद्याप अपयशी ठरलेली नाही, असे सांगतानाच त्यांनी अमेरिकेवर निशाणा साधला. इराणकडे अमेरिकेवर अविश्वास दाखवण्यासाठी पुरेशी कारणे आहेत, तर अमेरिकेने मात्र इराणवर विश्वास ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे सूचक विधान त्यांनी केले. इराणच्या प्रश्नांवर केवळ चर्चेतूनच तोडगा निघू शकतो, यावर त्यांनी पुन्हा एकदा भर दिला.

परराष्ट्र मंत्री अराघची यांनी स्पष्ट केले की, इराणने कधीही अण्वस्त्रांची आकांक्षा धरलेली नाही. सध्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतील परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची असून, संवाद आणि कराराशिवाय यावर कोणताही दुसरा मार्ग उपलब्ध नाही. ते म्हणाले की, "आम्ही होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सर्व जहाजांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी सहकार्य करण्यास तयार आहोत. तसेच, या भागातील परिस्थिती सुधारण्यासाठी चीनकडून उचलल्या जाणाऱ्या कोणत्याही पावलाचे आम्ही स्वागतच करू." इराणने नेहमीच मुत्सद्देगिरीला प्राधान्य दिले असून, युद्धविराम टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

पश्चिम आशियातील वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या संभाव्य मध्यस्थीबाबत विचारले असता, अराघची यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. "या संकटकाळात भारत कोणतीही विधायक भूमिका बजावणार असेल, तर इराण त्याचे मनापासून स्वागत करेल," असे ते म्हणाले. भारताचे इराणशी असलेले ऐतिहासिक संबंध पाहता, शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताचे योगदान महत्त्वपूर्ण ठरू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'एक दो तीन'ने बदललं नशीब!



बॉलिवूडची 'धक-धक गर्ल' माधुरी दीक्षित आज तिचा ५९वा वाढदिवस साजरा करत आहे. अभिनय, सौंदर्य आणि अप्रतिम नृत्यशैलीमुळे गेली अनेक वर्षे ती प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. मात्र माधुरीला खऱ्या अर्थाने सुपरस्टार बनवणारा टप्पा म्हणजे १९८८ मध्ये आलेल्या तेजाब या चित्रपटातील 'एक दो तीन' हे गाणं. तब्बल ७ मिनिटे २ सेकंद लांबीचं हे गाणं आजही बॉलिवूडच्या सर्वात आयकॉनिक गाण्यांपैकी एक मानलं जातं. माधुरी दीक्षितने वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवलं. तिने १९८४ मध्ये आलेल्या 'अबोध' या चित्रपटातून अभिनयाची सुरुवात केली. मात्र सुरुवातीच्या काळात तिच्या अनेक चित्रपटांना अपेक्षित यश मिळालं नाही. त्यामुळे करिअरमध्ये मोठं यश मिळेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता. पण १९८८ मध्ये आलेल्या 'तेजाब'ने तिचं संपूर्ण आयुष्य बदलून टाकलं. या चित्रपटात माधुरीसोबत अनिल कपूर मुख्य भूमिकेत होता. चित्रपटातील 'एक दो तीन' हे गाण रिलीज होताच संपूर्ण देशाला अक्षरशः वेड लावलं. प्रत्येकाच्या ओठांवर हेच गाणं ऐकू येत होतं. विशेष म्हणजे या गाण्यातील माधुरीच्या जबरदस्त डान्स स्टेप्स, चेहऱ्यावरील हावभाव आणि तिचा आत्मविश्वास यामुळे प्रेक्षक पूर्णपणे भारावून गेले. हे गाणं माधुरीच्या करिअरचं टर्निंग पॉइंट ठरलं. या एका गाण्यामुळे ती रातोरात स्टार बनली. आजही अनेक डान्स शो, स्टेज परफॉर्मन्स आणि कार्यक्रमांमध्ये 'एक दो तीन' हे गाणं आवर्जून वाजवलं जातं. त्या काळात या गाण्याची लोकप्रियता इतकी प्रचंड होती की माधुरीला 'डान्सिंग क्वीन' म्हणून ओळख मिळाली. या गाण्यामागे माधुरीची प्रचंड मेहनत होती. प्रसिद्ध कोरिओग्राफर सरोज खान यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, या गाण्यासाठी माधुरीने जवळपास ३० दिवस रिहर्सल केली होती. सरोज खान यांनी तिला हे गाणं कठीण असल्याचं सांगितलं होतं, पण माधुरीने कोणतीही भीती न बाळगता "मी तयार आहे" असं उत्तर दिलं होतं. तिची ही मेहनत आणि समर्पणच पुढे तिच्या यशाचं मोठं कारण ठरलं.

## 'जेलर 2'च्या सेटवर दुर्दैवी घटना

गेल्या काही दिवसांपूर्वी दाक्षिणात्य अभिनेता प्रभास याच्या आगामी 'फौजी' चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी अपघाताची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच आता सुपरस्टार रजीनाकांत (Rajanikant) यांच्या आगामी जेलर २ चित्रपटाच्या सेटवर दुर्दैवी घटना घडली आहे. चित्रपटाच्या शूटिंगसाठी सेट उभारण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागून 28 वर्षीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर कनाथूर पोलिसांनी तपास सुरू केला असून नेमका विजेचा धक्का कसा लागला याचा शोध घेतला जात आहे. अद्याप या प्रकरणी अधिकृत एफआयआर दाखल करण्यात आलेली नसली तरी पोलिसांकडून सर्व बाजूंनी चौकशी केली जात आहे.



# अदिती राव हैदरीचा जलवा!



अदिती राव हैदरी (Aditi Rao Hydari ) सध्या तिच्या स्टायलिश एअरपोर्ट लुकमुळे सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी ती फ्रान्सला रवाना झाली असून मुंबई विमानतळावरील तिचे फोटो आणि व्हिडिओ इंटरनेटवर वेगाने व्हायरल होत आहेत. तिच्या साध्या पण क्लासी स्टाइलने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये अनेक बॉलिवूड कलाकारांचा ग्लॅमरस अंदाज पाहायला मिळत आहे. आलिया भट्ट, उर्वशी रौतेला आणि तारा सुतारिया यांच्यानंतर आता अदिती राव हैदरीदेखील या प्रतिष्ठित सोहळ्यात सहभागी होणार आहे. त्यामुळे तिच्या रेड कार्पेट लुकची उत्सुकता चाहत्यांमध्ये वाढली आहे. कान्ससाठी रवाना होताना अदितीने गोल्डन ब्राउन रंगाचा ट्रेंच कोट, बेज फिटेड टॉप आणि डेनिम जीन्स असा साधा पण आकर्षक लुक निवडला होता. मिनिमल मेकअप, मोकळे केस आणि एलिगंट स्टाइलमुळे तिचा संपूर्ण लुक खूपच क्लासी दिसत होता. विशेष म्हणजे, जास्त ग्लॅमर न करता देखील ती खूप सुंदर दिसत असल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत. अदितीने एअरपोर्टला जाण्यापूर्वी तिचे काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले होते. या फोटोंवर तिचा पती आणि अभिनेता सिद्धार्थ यांनी केलेल्या कमेंटचीही मोठी चर्चा रंगली. सिद्धार्थने "गोल्डन गर्ल" अशी कमेंट करत तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. ही कमेंट पाहून चाहत्यांनीही या जोडप्याचं भरभरून कौतुक केलं. अनेकांनी त्यांना बॉलिवूडमधील सर्वात क्युट कपल्सपैकी एक म्हटलं आहे. अदिती राव हैदरी तिच्या रॉयल आणि पारंपरिक फॅशन सेन्ससाठी ओळखली जाते. मागील काही वर्षांत तिने अनेक आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये आपल्या हटके स्टाइलने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. त्यामुळे यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये ती कोणत्या खास अंदाजात रेड कार्पेटवर दिसणार याची उत्सुकता वाढली आहे.

# मौनी रॉयचा भन्नाट प्रवास



मौनी रॉय सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. चार वर्षांपूर्वी उद्योगपती सूरज नांबियार यांच्यासोबत लग्न केलेल्या मौनीने आता वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचं सोशल मीडियावर जाहीर केलं आहे. मात्र या चर्चांदरम्यान तिच्या अभिनय कारकिर्दीचीही जोरदार चर्चा होत आहे. छोट्या पडद्यापासून बॉलिवूडपर्यंतचा तिचा प्रवास खूपच खास राहिला आहे. आज सोशल मीडियावर मौनी रॉयची जबरदस्त लोकप्रियता आहे. इन्स्टाग्रामवर तिला तब्बल ३ कोटी ३० लाखांहून अधिक लोक फॉलो करतात. तिच्या स्टाइल, अभिनय आणि डान्समुळे ती नेहमीच चाहत्यांच्या चर्चेत असते. मौनीने २००७ मध्ये 'क्योंकि सास भी कभी बहू थी' या लोकप्रिय मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. या मालिकेत तिने 'कृष्णा तुलसी' ही भूमिका साकारली होती. तिच्या अभिनयाला प्रेक्षकांनी मोठी पसंती दिली आणि ती घराघरात प्रसिद्ध झाली. यानंतर मौनीने अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारल्या. पण तिच्या कारकिर्दीतील सर्वात खास गोष्ट म्हणजे तिने सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या भूमिका यशस्वीपणे साकारल्या. देवीची भूमिका असो किंवा नागिनची, दोन्ही रूपांत तिने प्रेक्षकांची मनं जिंकली. 'देवों के देव: महादेव' या मालिकेत मौनीने माता सतीची भूमिका केली होती. भगवान शंकरांच्या पहिल्या पत्नीची ही भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली. या मालिकेमुळे मौनीला मोठी लोकप्रियता मिळाली आणि ती घराघरात 'देवी' म्हणून ओळखली जाऊ लागली. या मालिकेतील तिचा साधेपणा आणि अभिनय आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. यानंतर एकता कपूर यांच्या 'नागिन' मालिकेत मौनी नागिनच्या भूमिकेत दिसली. या मालिकेने तिच्या कारकिर्दीला मोठी उंची मिळवून दिली. 'नागिन'मधील तिची स्टाइल, अभिनय आणि स्क्रीन प्रेझेन्स प्रेक्षकांना प्रचंड आवडली.

# अंपायरला शिवीगाळ करणं भोवलं!

## मुंबई इंडियन्सच्या दिग्गजावर BCCI ची मोठी कारवाई

**महाईन्यूज । मुंबई**

**धरमशाळेच्या मैदानावर झालेल्या सामन्यात पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना पंजाब किंग्सने २०० धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबई इंडियन्सकडून तिलक वर्माने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने हा सामना ६ गडी राखून आपल्या नावावर केला. दरम्यान सामना जिंकल्यानंतर मुंबई इंडियन्ससाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. बीसीसीआयकडून मुंबई इंडियन्सचा प्रशिक्षक कायरन पोलार्डवर कारवाई करण्यात आली आहे.**



या सामन्यानंतर कायरन पोलार्डवर बीसीसीआयकडून कारवाई करण्यात आल्याची माहिती आयपीएलने आपल्या प्रेस रिलीझमधून दिली आहे. कायरन पोलार्डच्या मॅच फी वर १५ टक्के दंड आकारण्यात आला आहे. पोलार्डने आयपीएलच्या आचार संहितेच्या लेव्हल-१ चे उल्लंघन केले आहे. दंड ठोठावण्यासह १ डिमेरिट पॉईंट देखील देण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कायरन पोलार्डने चौथ्या अंपायरला शिवीगाळ केल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. पोलार्डने आचारसंहितेच्या कलम २.३ चे उल्लंघन केल्याची कबुली दिली आहे. आयपीएलचे काही नियम आहेत, ते मोडले की खेळाडू असो, प्रशिक्षक असो किंवा मग अधिकारी, आयपीएलकडून कारवाई केली जाते. कायरन पोलार्ड मुंबई इंडियन्सचा फलंदाजी प्रशिक्षक आहे. त्याने लाईव्ह सामन्यादरम्यान चौथ्या अंपायरविरुद्ध अश्लील भाषेचा वापर केला होता.




# लागोपाठ ५ सामने गमावूनही पंजाब किंग्स प्लेऑफमध्ये जाणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. धरमशाळेच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात पंजाबने मुंबई इंडियन्स संघासमोर विजयासाठी २०१ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना तिलक वर्माने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर पंजाबने मुंबईवर शेवटच्या षटकात दमदार विजय मिळवला. या विजयाचा गुणतालिकेत मुंबई इंडियन्सला काहीच फायदा झालेला नाही. कारण मुंबईचा संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. पण या पराभवानंतर पंजाब किंग्स संघाचं टेन्शन वाढलं आहे. दरम्यान कसं असेल प्लेऑफमध्ये जाण्याचं समीकरण? जाणून घ्या.**



पंजाब किंग्स संघाला आधी प्लेऑफमध्ये जाण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. कारण या संघाने सुरुवातीच्या सलग ६ सामन्यांमध्ये विजय मिळवला होता. त्यानंतर पुढील पाचही सामन्यांमध्ये पंजाबला लागोपाठ पराभवाचा सामना करावा लागला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाचे अजूनही २ सामने शिल्लक आहेत. पंजाबचा पुढील सामना पंजाब किंग्स संघाविरुद्ध होणार आहे. तर शेवटच्या सामन्यात पंजाबचा सामना लखनौविरुद्ध होणार आहे.

पंजाब किंग्स संघाला जर प्लेऑफ गाठायचं असेल, तर एकमेव मार्ग शिल्लक आहे. तो म्हणजे, पंजाबला पुढील दोन्ही सामन्यांमध्ये विजय मिळवावा लागणार आहे. सध्या पंजाबचे १३ गुण असून हा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानी आहे. पंजाबचं टेन्शन वाढवणारी बातमी म्हणजे, कोलकाता नाईट रायडर्स, चेन्नई सुपर किंग्स, दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स हे संघ देखील प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहेत. त्यामुळे पंजाबला पुढील दोन्ही सामने कुठल्याही परिस्थितीत जिंकावे लागणार आहेत.

चेन्नई सुपर किंग्स संघाचा सामना १२ गुणांसह पाचव्या स्थानी आहे. तर चेन्नईकडे देखील प्लेऑफमध्ये जाण्याची संधी असणार आहे. पण मार्ग मुळीच सोपा नसेल. जर चेन्नईने पुढील दोन्ही सामने जिंकले, तर त्यांचे १६ गुण होतील. तर राजस्थान रॉयल्सने आपले पुढील ३ पैकी २ सामने जिंकले, त्यांचे देखील १६ गुण होतील. पंजाबला जर टॉप ४ मध्ये प्रवेश करायचा असेल, तर त्यांना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाला पराभूत करावं लागणार आहे. त्यानंतर साखळी फेरीत लखनौ सुपर जायंट्स संघाविरूद्ध होणारा सामना पंजाबसाठी निर्णायक ठरेल.

स्मार्ट PCMC

महाईन्यूज

ePaper

। शनिवार ।

दि. 16 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिकेची आर्थिक घसरण; ठेवी मोडणार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**



पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या गंभीर बनली असून नवीन विकासकामे आणि प्रकल्प राबवण्यासाठी निधीअभावी अडचणी निर्माण झाल्या आहेत. महापालिकेवर तब्बल ४ हजार ५०० कोटी रुपयांची देणी असून सुरू असलेल्या खर्चिक कामांची बिले भागवताना उत्पन्नाचा मोठा भाग खर्ची पडत आहे. त्यामुळे नवीन कामांसाठी निधी उपलब्ध नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर विकासकामांच्या नावाखाली महापालिकेच्या ठेवी मोडण्याची तयारी सत्ताधाऱ्यांकडून सुरू करण्यात आली आहे. तसेच मोठ्या प्रकल्पांसाठी कर्जउभारणीची प्रक्रियाही पुन्हा सुरू करण्यात आली आहे. प्रभागातील कामांसाठी निधी मिळत नसल्यामुळे नगरसेवकांपुढे कामे कशी करायची, असा प्रश्न उभा राहिला आहे.

महापालिकेकडे एकूण ५ हजार ७६८ कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यापैकी १ हजार ५५० कोटी रुपये सर्वसाधारण निधीत आहेत, तर ४ हजार २१८ कोटी रुपये राखीव स्वरूपात आहेत. विकासकामांसाठी सर्वसाधारण निधी मोडण्याचा प्रस्ताव पुढे येत असून त्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याची तयारी सुरू आहे. मात्र यामुळे महापालिकेची आर्थिक कणा कमकुवत होण्याची आणि पत घसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, विकासकामांना वारंवार मुदतवाढ देण्यात येत असल्याने खर्चात वाढ होत असल्याचेही समोर आले आहे. अनावश्यक खर्च टाळावा आणि काटकसरीने कामकाज करावे, असा सल्ला वित्त विभागाने दिला आहे. विविध विभागांतील

> “ महापालिकेच्या आवश्यक तसेच, रखडलेल्या कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यासाठी महापालिकेचा सर्वसाधारण निधी त्या कामांसाठी खर्च केला जाऊ शकतो. सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ती प्रक्रिया केली जाईल.
>
> **- अभिषेक बारणे,** अध्यक्ष, स्थायी समिती


> “ महापालिकेचे अत्यावश्यक प्रकल्प व विकामकामे निधीअभावी रोखले जाणार नाहीत. केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेज फंडातून निधीसाठी पाठपुरावा केला जात आहे. त्यासाठी कर्ज उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बँक तसेच, वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्याबाबत अनेक बैठका झाल्या आहेत.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी,** आयुक्त, महापालिका

मनुष्यबळ ठेकेदारांमार्फत घेतले जात असून त्यालाही सतत मुदतवाढ दिल्याने आर्थिक बोजा वाढत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच, टोकन तरतुदीच्या माध्यमातून मोठे प्रकल्प अर्थसंकल्पात समाविष्ट केल्यामुळे दायित्व वाढत असल्याचेही निदर्शनास आले आहे. वित्तीय नियोजन आणि नियंत्रणाबाबत ठोस धोरणाची गरज असल्याचे मत वित्त विभागाने व्यक्त केले आहे.

दरम्यान, अत्यावश्यक प्रकल्प निधीअभावी थांबवले जाणार नसल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडातून निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू असून कर्जउभारणीसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बँकांसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनीही आवश्यक कामांसाठी सर्वसाधारण निधी वापरण्याचा प्रस्ताव मांडण्यात येणार असून त्यासाठी सभेची मान्यता घेतली जाईल, असे सांगितले.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on

WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ‘वायसीएम’मधील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावणार!

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून रुग्णालयाची पाहणी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी आज रुग्णालयाचा सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करत त्रुटी दूर करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले.**



अभिषेक बारणे यांनी रुग्णालयातील सर्व संबंधित विभाग प्रमुख आणि अधिकाऱ्यांच्या समवेत ४ थ्या मजल्यावरील वॉर्डची सविस्तर पाहणी केली. यावेळी रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेताना त्यांनी वॉर्डातील अत्यावश्यक सोयी, वैद्यकीय उपकरणांची स्थिती आणि लिफ्टच्या वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांची दखल घेतली. लिफ्ट दुरुस्तीबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता, याबाबत तातडीने कार्यवाही करून रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय टाळण्याचे आदेश त्यांनी दिले.

रुग्णालयावर वाढणारा रुग्णांचा भार विचारात घेता, परिसरातील मोकळ्या जागेचा प्रभावी वापर करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. या जागेत इमारतींचा विस्तार करून नवीन आरोग्य सेवा सुरू करण्याच्या शक्यता त्यांनी पडताळून पाहिल्या. रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी टॉयलेट स्वच्छता, बेडची व्यवस्था आणि सुरळीत पाणीपुरवठा यांवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विद्युत विभाग आणि अग्निशमन यंत्रणेची सुरक्षाविषयक मानके तपासून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

रुग्णालयातील औषध साठा आणि वैद्यकीय उपकरणांच्या साठवणूक (स्टोरेज) विभागाची पाहणी करताना बारणे यांनी औषधांच्या उपलब्धतेचा आढावा घेतला. सामान्य रुग्णांना वेळेवर औषधे मिळतील आणि कोणत्याही उपकरणाच्या अभावी उपचार थांबणार नाहीत, यासाठी योग्य नियोजन व व्यवस्थापन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



> सामान्य नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हीच आमची प्राथमिक जबाबदारी आहे. वायसीएम हे शहरातील महत्त्वाचे रुग्णालय असून येथील सेवा दर्जेदार राखण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. या पाहणी दौऱ्यामुळे रुग्णालयातील अनेक प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची चिन्हे आहेत.
>
> **– अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## निगडीत ४०६ ग्रॅम गांजासह आरोपी अटकेत

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने निगडी परिसरात मोठी कारवाई करत गांजा विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून ४०६ ग्रॅम गांजा, रोख रक्कम असा एकूण २० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या प्रकरणात एका महिलेचे नावही समोर आले आहे.

याप्रकरणी NIGDI POLICE STATION येथे एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(II)(अ) आणि २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रकाश तुकाराम शिंगे (वय ३५, व्यवसाय बिगारी काम, रा. संजीव हॉटेल चौक, ओटा स्किम, निगडी) असे आहे. आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्याकडून अधिक चौकशी सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ मे २०२६ रोजी दुपारी १२.३४ वाजण्याच्या सुमारास निगडी पोलीस स्टेशन हद्दीतील म्हसोबा मंदिराजवळील पायवाट परिसर, दळवीनगर झोपडपट्टी, पत्राशेड निगडी येथे अंमली पदार्थ विरोधी पथक गस्त घालत होते. त्यावेळी संशयित हालचाली करणाऱ्या आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडे ४०६ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला.

पोलिसांनी आरोपीकडून गांजा तसेच रोख रक्कम असा एकूण २०,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपीने सदरचा गांजा निगडीतील ओटा स्किम परिसरात राहणाऱ्या सपना साठे नामक महिले कडून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. त्यानुसार संबंधित महिलेचाही शोध सुरू करण्यात आला आहे.

ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस शिपाई संतोष बिभीषण सपकाळ यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली असून पुढील तपास पोउपनि पाटील करीत आहेत.

## शिक्षणाच्या आरक्षित जागांचे खाजगीकरण थांबवा; चेतन बेंद्रे

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनावळे येथील सर्व्हे नं. ३८ पै. व ४४ पै. मधील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेली सुमारे ९१ गुंठे जागा ३० वर्षांसाठी खाजगी संस्थेला लीज तत्वावर देण्याच्या प्रस्तावाला सामाजिक कार्यकर्ते चेतन बेंद्रे यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.**



महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार सदर जागा ही सार्वजनिक माध्यमिक शाळेसाठी आरक्षित आहे. ही जागा सर्वसामान्य, मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी राखीव ठेवण्यात आली होती. मात्र आता हीच सार्वजनिक जागा खाजगी संस्थेला देण्याचा प्रयत्न म्हणजे शिक्षणाच्या व्यापारीकरणाला चालना देणारा निर्णय असल्याची टीका चेतन बेंद्रे यांनी केली आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीने या विषयासंदर्भात महासभेकडे शिफारस केली असली, तरी अंतिम निर्णय घेताना सभागृहातील सर्व नगरसेवकांनी पक्षीय भूमिका बाजूला ठेवून नागरिकांच्या हिताचा विचार करावा आणि या प्रस्तावाला एकमुखी विरोध करावा, असे आवाहन चेतन बेंद्रे यांनी केले आहे.

“महापालिकेने स्वतः दर्जेदार आणि सुसज्ज माध्यमिक शाळा उभारण्याऐवजी सार्वजनिक मालमत्ता खाजगी संस्थांच्या ताब्यात देणे अत्यंत दुर्दैवी आहे. शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे, व्यवसाय नाही. पुनावळे परिसर झपाट्याने विकसित होत असताना भविष्यात हजारो विद्यार्थ्यांना सार्वजनिक शिक्षणाची गरज भासणार आहे. अशावेळी ३० वर्षांसाठी जागा लीजवर देणे म्हणजे नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारा निर्णय ठरेल,” असे चेतन बेंद्रे यांनी म्हटले आहे.

तसेच महानगरपालिकेने हा प्रस्ताव तात्काळ मागे घेऊन त्या जागेवर मनपाची स्वतःची आधुनिक माध्यमिक शाळा उभारावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

सदर निर्णयाविरोधात नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आवाज उठवावा, असे आवाहनही चेतन बेंद्रे यांनी केले आहे.

# सात हजाराहून अधिक तरुणाईच्या स्वप्नांना बळ!

## आमदार शंकर जगताप यंचा पुढाकार : नवी सांगवीत रोजगार मेळावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून युवकांच्या स्वप्नांना रोजगारांचे पंख देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा गुरुवारी (दि. १४) पार पडला. चिंचवड मतदार संघातील नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश स्कूलमध्ये पार पडलेल्या आजच्या मेळाव्यामध्ये १५४७८ युवक युवतींनी रोजगारासाठी नोंदणी केली विविध १२० कंपन्यां मध्ये या युवकांच्या मुलाखती पार पडल्या. यामध्ये ७ हजाराहून अधिक युवक युवतींना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.**




दरम्यान "आजच्या बदलत्या काळात केवळ पदवी असून चालत नाही, तर त्याला 'स्किल डेव्हलपमेंट'ची अर्थात कौशल्य विकास जोड असणे ही काळाची गरज बनली आहे. भारताला आत्मनिर्भर आणि विकसित बनवण्याचे स्वप्न देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आपल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाहत आहे. हे स्वप्न केवळ आपल्या युवाशक्तीच्या आणि त्यांच्या हातातील कौशल्याच्या बळावरच साकार होऊ शकते," असा विश्वास आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, प्रतिभा महिला प्रतिष्ठान आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, कौशल्य रोजगार उद्योजकता विभाग उपायुक्त अनुपमा पवार, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त सु. रा. वराडे, पिंपरी चिंचवड महापालिका पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी व्यासपीठावर स्थानिक पदाधिकारी तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आमदार जगताप म्हणाले, "आज पुणे हे जागतिक पातळीवर 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' (जीसीसी) म्हणून उदयास येत आहे. या पुण्याच्या ग्रोथ हब साठी केंद्र सरकारकडून ६,००० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे, कारण येथे रोजगाराच्या उदंड संधी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नुकत्याच सुरू झालेल्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे पुणे-मुंबई अंतर कमी झाले नसून, ती पुण्याच्या विकासाची 'अपॉर्च्युनिटी लिंक' ठरली आहे." "भारताच्या एकूण जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १५ टक्के असून, यामध्ये एमएसएमई आणि स्टार्टअप्सचे योगदान मोठे आहे. जेव्हा राज्याचे नेतृत्व दावोस येथे जाते, तेव्हा देशात येणाऱ्या एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी एकटा महाराष्ट्र ३७ टक्के गुंतवणूक खेचून आणतो. मुंबईनंतर पुण्यात गुंतवणुकीचा ओघ सर्वाधिक असून, या उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवण्याचे काम या रोजगार मेळाव्यातून होत आहे," असेही आमदार जगताप यांनी स्पष्ट केले.

गेल्या ११ वर्षांपासून असे रोजगार मेळावे आम्ही आयोजित करत असल्याचे सांगून आमदार जगताप म्हणाले, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रोजगाराची संधी पोहोचावी, या 'अंत्योदय' भावनेतून आम्ही काम करत आहेत," "महाराष्ट्र सरकार ५ ट्रिलियन इकॉनॉमीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असून राज्याची अर्थव्यवस्था सध्या ६६ अब्ज डॉलरवर पोहोचली असल्याचे आमदार जगताप म्हणाले.

उपायुक्त अनुपमा पवार म्हणाल्या की, "रोजगार मेळावा ही तरुणांसाठी यशाची पहिली पायरी आहे. मिळालेल्या संधीचा स्वीकार करून प्रवासाला सुरुवात करावी आणि मग ध्येय गाठावे. मात्र, आजच्या युवा पिढीला 'इन्स्टंट' यश हवे असते. तरुणांनी एखाद्या संस्थेत प्रवेश करून आधी स्वतःला सिद्ध करावे आणि मग पंख पसरावे. आधीच पंख पसरून भरारी घेण्याचा प्रयत्न केल्यास धडपडण्याची शक्यता अधिक असते." शिक्षण घेता घेता विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, हाच केंद्र आणि राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात पवार यांनी दिवंगत लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींना उजाळा दिला. "युवकांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी दिवंगत लक्ष्मण जगताप नेहमीच प्रयत्नशील असायचे. गंभीर आजारपणाशी झुंज देत असतानाही, गेल्या वेळच्या रोजगार मेळाव्यात ते ऑनलाइन सहभागी झाले होते. यावरूनच त्यांची युवकांविषयीची असलेली अथांग तळमळ दिसून आली," अशा भावूक शब्दांत त्यांनी लक्ष्मण जगताप यांच्या कार्याचा गौरव केला.

महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी म्हणाले की, "हा रोजगार मेळावा खऱ्या अर्थाने येथे आलेल्या उमेदवारांच्या आयुष्यात आनंदाचा क्षण घेऊन आला आहे. घरातील सदस्याला नोकरी मिळणे कुटुंबासाठी किती महत्त्वाचे असते, हे मी जाणतो. आई-वडिलांनी कष्टाने दिलेल्या शिक्षणाचे उमेदवारांनी सोने करावे." स्वतःचे उदाहरण देत आयुक्त म्हणाले, "मी एका छोट्या गावातून आलेलो आहे. त्यामुळे पुण्यासारख्या औद्योगिक आणि शैक्षणिक हबमध्ये राहणारा येथील प्रत्येक तरुण भाग्यवान आहे, कारण त्याला शिक्षण, रोजगार आणि इंडस्ट्री सगळं एकाच ठिकाणी उपलब्ध झालं आहे. आजच्या उद्योगांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे. केवळ नोकरी मिळवणे पुरेसे नाही, तर ती टिकवणे आणि कामगिरी सिद्ध करणे महत्त्वाचे आहे. ज्या भागात कुशल मॅनपावर उपलब्ध असते, तिथून कंपन्या कधीही स्थलांतरित होत नाहीत. त्यामुळे शासन आणि लोकप्रतिनिधींसमोर आगामी काळात 'स्किल मॅनपावर' घडवण्याचे मोठे आव्हान असेल."

## एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल; १२ वी सीबीएसई बोर्डमध्ये मारली बाजी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सीबीएसई बोर्ड इयत्ता १२ वी चा विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल लागला आहे. विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे एकूण ४१ विद्यार्थी उत्तम गुण मिळवून पास झाले आहेत.**





### यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन...

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील व्यावसायिक गरज ओळखून विविध शालेय उपक्रमांचे आयोजन केले होते त्याचा विद्यार्थ्यांना उपयोग झाला. यशस्वी विद्यार्थ्यांचे पीसीईटीच्या विश्वस्त मंडळाने अभिनंदन केले.

विज्ञान शाखेत दीपांशु सरकार याने ९२.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. काश्वी तन्वर हिने ९१.४ टक्के द्वितीय क्रमांक आणि एस. अनंताश्री ९१.२ टक्के तृतीय क्रमांक मिळवला आहे. चौथा क्रमांक उदय निंबोरकर ९०.८ टक्के आणि पाचवा क्रमांक सुजल कापसे ८९.२ टक्के या विद्यार्थ्यांनी मिळवला आहे. वाणिज्य शाखेत वैभव ओझा याने ९२.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. पार्थ गोयल याला ८८.८ टक्के द्वितीय क्रमांक आणि ख़ुशी बार्गी ८७.४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयात भाव्या अंगोजी आणि खुशी बार्गी यांना १०० गुण मिळाले आहेत. तसेच इंग्रजी मध्ये कुणाल तहसीलदार ९७ गुण, गणित विषयात काश्वी तन्वर हिला ९६ गुण, भौतिक शास्त्र मध्ये दीपांशु सरकार याला भौतिक शास्त्र ९३ आणि रसायन शास्त्र मध्ये ९१ गुण, भाव्या अंगोजी हिला जीवशास्त्र मध्ये ८८ गुण, पार्थ गोयल याला अर्थशास्त्र मध्ये ९३, वैभव ओझा याला व्यावसायिक शिक्षण ९५ आणि लेखाशास्त्र मध्ये ९९ गुण मिळाले आहेत. तर म्हाळसा पराते आणि उदय निंबोरकर यांना शारीरिक शिक्षण विषयात प्रत्येकी ९६ गुण मिळाले आहेत. तसेच माहिती शास्त्र पद्धती मध्ये भाव्या ओन्गोळे हिने ९८ गुण मिळवले.

# स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्वच्छ व हरित पिंपरी चिंचवड शहर योजना सुरू करणार; महापौर

## महापौरांच्या हस्ते गणेश तलाव, सेक्टर २६, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान येथे वृक्षारोपण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'स्वच्छ व हरित पिंपरी चिंचवड शहर योजना' लवकरच सुरू करण्यात येईल, ही योजना महापालिका आणि नागरिकांच्या लोकसहभागातून यशस्वी करण्यात येईल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पर्यावरण संवर्धन, शहरातील हरित क्षेत्र वाढविणे आणि नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने निगडी प्राधिकरण येथील गणेश तलाव, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान येथे आयोजित नियोजन बैठकीत महापौर रवि लांडगे बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्या शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे,अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे,मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते प्रा.नामदेव जाधव,निलेश शिंदे, सुर्यकांत मुथियान,विजय नाईक यासह निगडी प्राधिकरण रेसिडेंट फोरमचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले, वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरण संतुलन राखणे ही येत्या काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. महापालिका नागरिकांना रोपे, खत तसेच आवश्यक तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देणार आहे. शहरात पुढील काळात तब्बल २ लाख वृक्षारोपण करण्याचा मानस असून, त्यासाठी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले, महापालिकेच्या राखीव भूखंडांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे नियोजन आहे. तसेच शहरातील निवडक ठिकाणी 'डेन्स फॉरेस्ट' विकसित करण्याची संकल्पना राबविण्यात येणार असून, त्यामुळे शहरातील हरित क्षेत्रात मोठी वाढ तर तापमानात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी महापालिका विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत असल्याचे देखील त्यांनी नमूद केले.

यावेळी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांचा महापालिकेकडून मानपत्र देऊन सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तृत्वाने मोलाची भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या धोरणानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.**



यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, माजी महापौर तथा नगरसदस्या अपर्णा डोके, नगरसदस्या मनिषा चिंचवडे, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, सुरेश भोईर तसेच उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांची मुले नरेंद्र सायकर, निलेश सायकर व नातू साहिल सायकर हे देखील उपस्थित होते. यावेळी मानपत्राचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत तबलावादक धोंडीराम सायकर यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय राहिले आहे. बालवयापासून संगीत साधनेशी जुळलेले त्यांचे नाते आजही अखंडपणे सुरू असून, आपल्या भावपूर्ण आणि नेमक्या तबलावादनातून त्यांनी अनेक नामवंत गायक, कलावंतांच्या मैफिली संस्मरणीय केल्या आहेत. विविध सांगीतिक व्यासपीठांवर तबल्याची प्रभावी साथसंगत करताना त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा जपली आहे. तसेच नवोदित कलाकारांना मार्गदर्शन, स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून योगदान आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्यामुळे शहराच्या सांस्कृतिक वातावरणाला त्यांनी समृद्ध केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.